# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१६/ 4219

दिनांक : 29 DEC 2016

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : ईबीसी २०१६-१७ चे विद्यार्थ्यांनी भरलेले ऑनलाईन फॉर्म्स सादर करण्याबाबत
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती तसेच वसतीगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत

१. **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७"**
२. **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७"**

(विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन भरलेले अर्ज सादर करण्याबाबतची कार्यवाही)

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी-ऑनलाईन/२०१६-१७/१२९, दि. २०/१०/२०१६
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि.३१-०३-२०१६
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३-१०-२०१६

संदर्भीय पत्रान्वये सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर वाढीव मुदत देऊन भरुन घेण्याचा कालावधी दि. ३०/१२/२०१६ पर्यंत ठेवण्यांत आलेला आहे. संस्थांनी दि. ३०/१२/२०१६ पर्यंत प्राप्त झालेल्या ऑनलाईन फॉर्म्सची छाननी करुन सदर अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करण्याची कार्यवाही पूर्ण करायची आहे.

विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज व आवश्यक ती शैक्षणिक कागदपत्रे विद्यापीठ/महाविद्यालये/तंत्रनिकेतनांनी द्वीप्रतीत उपलब्ध करुन घ्यावयाची आहेत.

ह्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता भौगोलिकदृष्ट्या ४ विभाग पाडण्यात आले आहेत. ते खालिल परिशिष्ट अ मध्ये नमूद केल्यानुसार आहेत. सोबत जोडलेल्या दिनांकनिहाय यादीनुसार आपल्या संस्थेतील फॉर्म्स प्रत्यक्ष ईबीसीचे काम हाताळणाऱ्या कर्मचाऱ्याने घेऊन जायचे आहेत. तसेच आपल्या संस्थेस दिलेल्या दिनांकालाच सदर केंद्रावर प्रत्यक्ष हजर राहून ऑनलाईन फॉर्म्सची छाननी; तपासणी पथकातील छाननी सदस्याकडून करुन घ्यावयाची आहे. त्याकरिता सर्वांना सूचित करण्यांत येते की, प्रत्येक छाननी केंद्रामध्ये एक छाननी प्रमुख असतील, संस्थांच्या प्रतिनिधींनी प्रथम त्यांच्याशी संपर्क साधायचा आहे. छाननी प्रमुखाच्या मार्गदर्शनानुसार आपल्या संस्थेचे फॉर्म्स त्याच दिवशी छाननी करुन घ्यावयाचे आहेत. सर्व अर्जांच्या छाननी पश्चात आपणांस त्रुटींचा तक्ता दिला जाईल. छाननी प्रमुखाने आपणांस ठरवून दिलेल्या कालावधीत सदर त्रुटींची पूर्तता करावयाची आहे. विहीत कालावधीत त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या संस्थांचे अर्ज दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही पूर्वसूचना न देता नामंजूर करण्यांत येणार आहेत. याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

..२.

आपल्या सर्व अर्जांची छाननी, छाननी केंद्रात झाल्यानंतर सदर अर्जाच्या फाईल्स खालिल परिशिष्टात नमूद केलेल्या संस्थेतील संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांकडे नेऊन सूपूर्द करावयाच्या आहेत व त्याची पोचपावती घ्यावयाची आहे.

## परिशिष्ट अ

| अ.क्र. | विभाग | छाननी केंद्र | छाननीपश्चात अर्ज जमा करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | **मुंबई** | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई<br>४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई<br>४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१. |
| २ | **ठाणे** | डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पश्चिम) | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे<br>फडकेपाडा, मुंब्रा, जि. ठाणे |
| ३ | **नवी मुंबई** | तेरणा इंजिनियरिंग कॉलेज, नेरुळ,<br>नवी मुंबई | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे<br>फडकेपाडा, मुंब्रा, जि. ठाणे |
| ४ | **कोकण** | फिनोलेक्स ॲकॅडेमी ऑप मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, रत्नागिरी | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी<br>थिबा पॅलेस, जि. रत्नागिरू |

ह्या वर्षापासून **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७"** आणि **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७"** ह्या दोन्ही योजना एकत्रितपणे सुरु करण्यांत आल्या आहेत. व दोन्ही योजनांमध्ये विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याची शेवटची तारीख दि. ३०/१२/२०१६ अशी ठेवण्यात आली आहे. त्यानुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, दोन्ही योजनांचे निकष व नियम संस्थांना या आधीच कळविण्यांत आलेले आहेत. त्यानुसार दोन्ही योजनांच्या स्वतंत्र फाईल्स तयार करुन छाननी केंद्रांवर सादर करावयाच्या आहेत.

अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या योजनेतील ऑनलाईन अर्जासोबत खालील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. ऑनलाईन अर्ज
**(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्यांच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
२. ऑनलाईन अर्जाची रिसिट कम ॲकनॉलेजमेंट
**(अर्जाच्या शेवटी केवळ प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.)**
३. मूळ उत्पन्नाचा दाखला
४. डोमिसाईल सर्टिफिकेट (याबाबत सर्वांना कळविण्यांत येते की, यापुढे लिव्हींग सर्टीफिकेट व जन्म दाखला ग्राह्य धरला जाणार नाही.)
५. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका (विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेवर FAIL असे नमूद केलेले असल्यास पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतचे प्राचार्यांचे साक्षांकन [Attestation] असणे अनिवार्य आहे.)
६. रेशनकार्डची छायांकीत प्रत
७. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
८. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची शुल्क जमा पावती
९. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला असल्यास)
१०. आधार कार्डाची छायांकीत प्रत
११. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असलेल्या पासबुकची प्रत नसावी.)
१२. ५० टक्के शिक्षण शुल्कापेक्षा उत्पन्न कमी असल्यास ज्यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले त्यांचे मूळ प्रतिज्ञापत्र / शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास बॅंकेचे प्रमाणपत्र
१३. इतरत्र कोणतीही सवलत न घेतल्याबाबतचे घोषणापत्र
१४. साध्या पेपरवरील विद्यार्थी/आई/वडील/पालक यांनी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र (संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)
१५. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केले असल्यास)
१६. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत

...३.

तसेच संस्थांनी ईबीसीचे प्रस्ताव सादर करतांना खालील प्रमाणपत्रे व कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

१. विहीत केलेले हमीपत्र व प्रमाणपत्र
(संस्था स्तरावरील समितीने छाननी केलेल्या समितीद्वारे छाननी केलेल्या एकूण अर्जांबाबतचे)

२. शिक्षण शुल्क तक्ता
(ऑनलाईन प्रणालीवर दर्शविण्यांत आलेल्या "Eligibility Matrix" तक्त्यात नमूद केलेल्या वर्षाप्रमाणे)

महत्त्वाची टिप्पणी :

अर्जासोबत जोडावयाच्या सर्व छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात. विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केलेले असल्यास प्रचलित नियमानुसार विद्यार्थ्याने विहीत प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. (प्रपत्र ब)

ब. तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ऑनलाईन अर्जासोबत खालील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.

१. ऑनलाईन अर्ज
**(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
२. ऑनलाईन अर्जाची रिसिट कम ॲकनॉलेजमेंट
**(अर्जाच्या शेवटी केवळ प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.)**
३. अल्पभूधारक/नोंदणीकृत मजूराचा पाल्य असल्याचा तहसिलदारांकडून प्राप्त केलेला मूळ दाखला
४. वसतीगृह प्रमुखाकडून प्रमाणित केलेले बोनाफाईड सर्टिफिकेट
५. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची वसतीगृहाची शुल्क जमा पावती
६. पासबुकची छायांकीत प्रत
७. इतरत्र कोणतीही सवलत न घेतल्याबाबतचे घोषणापत्र
८. साध्या पेपरवरील विद्यार्थी/आई/वडील/पालक यांनी सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र (संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)
९. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केले असल्यास)
१०. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत

विहीत केलेले हमीपत्र व प्रमाणपत्र
(संस्था स्तरावरील समितीने छाननी केलेल्या समितीद्वारे छाननी केलेल्या एकूण अर्जांबाबतचे)

महत्त्वाची टिप्पणी :

अर्जासोबत जोडावयाच्या सर्व छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात. विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केलेले असल्यास प्रचलित नियमानुसार विद्यार्थ्याने विहीत प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. (प्रपत्र ब)

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

## सर्व संस्थांनी खालील सूचनांप्रमाणे ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

१. ऑनलाईन प्रणालीवर Report Menu मधील Candidate List Applied (RCSMFRS) ह्या रिपोर्टप्रमाणे ऑनलाईन फॉर्म्सची यादी सादर करावयाची आहे. सदर Report प्रथमतः Export to Excel करुन घ्यावा. तद्नंतर सदर रिपोर्टमध्ये नको असलेले कॉलम्स Delete करुन खालीलप्रमाणे १० कॉलमचा Report A4 Size Paper वर Landscape मध्ये सादर करावा. सदर Report च्या वर दोन रो वाढवून १ल्या रो मध्ये संस्थेचा डिटीई कोड व नाव तसेच २ऱ्या रो मध्ये EBC Applied candidate List for A.Y. 2016-17 असे नमूद करावे.

| Sr. No. | Admission Year | Course Name | Application ID | Candidate Name | Current Studying Year | Total Income | Eligibility Percentage | Tution Fee | Tution Fee To Be Reimbursed |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |

महत्त्वाची सूचना : वरील Report Download करुन घेतल्यानंतर त्याचा Sequence म्हणजेच Sr.No. कोणत्याही कारणास्तव बदलू नये. तसेच सदर Sr.No. नुसारच फाईल्समध्ये फॉर्म्स जोडायचे आहेत.

२. डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेकरिताचे फॉर्म्स सोबत सुध्दा ऑनलाईन प्रणालीवर Report Menu मधील Candidate List Applied (DPDHMAS) ह्या रिपोर्टप्रमाणे ऑनलाईन फॉर्म्सची यादी सादर करावयाची आहे. परंतु सदर यादी Edit करण्याची आवश्यकता नाही. सदर यादी जशी आहे तशीच सादर करावयाची आहे. मात्र सदर Report च्या वर दोन रो वाढवून १ल्या रो मध्ये संस्थेचा डिटीई कोड व नाव तसेच २ऱ्या रो मध्ये DPD Hostel Maintenance Applied candidate List for A.Y. 2016-17 असे नमूद करावे.

३. सर्व अर्ज सादर करतांना २० फॉर्म्सपर्यंत साधी ऑफिस फाईल वापरली तरी चालेल. मात्र २० फॉर्म्सपेक्षा जास्त असलेले फॉर्म्स बॉक्स फाईल्समध्येच सादर करावेत. तसेच बॉक्स फाईलमध्ये सर्वसाधारणपणे जेवढे फार्म्स सहजतेने सामावतील तेवढेच फॉर्म्स असावेत. बॉक्स फाईलच्या क्लिपच्या मर्यादेच्याबाहेर फॉर्म्स जोडू नयेत. तसेच काही संस्था ओपन फोल्डर्समधून फॉर्म्स सादर करतात. याबाबत सूचित करण्यांत येते की, ओपन फोल्डर्समधून आणलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

४. प्रत्येक फॉर्मच्या वरच्या बाजूला उजव्या कोपऱ्यामध्ये ठळक अक्षरामध्ये अनुक्रमांक नमूद करावा.

५. प्रत्येक फाईलमध्ये त्या त्या फाईलमध्ये जेवढे फॉर्म्स असतील त्यानुसार यादी फाईलसोबत जोडावी. म्हणजेच १ल्या फाईलमध्ये जर १ ते ३७ फॉर्म्स असतील तर सदर फाईलच्या सुरुवातीलाच १ ते ३७ क्रमांकाची यादी जोडलेली असावी. त्याचप्रमाणे त्यापुढील प्रत्येक फाईलमध्ये त्या त्या फाईलमध्ये असणाऱ्या फॉर्म्सची यादी सुरुवातीला जोडण्यात यावी. याचे कारण एवढेच आहे की, छाननी केंद्रावरील कोणत्याही छाननी सदस्यामार्फत प्रत्येक फाईल स्वतंत्ररित्या छाननी करुन घेणे शक्य होईल.

६. तसेच सर्व फॉर्म्सची एक एकत्रित यादी छाननी केंद्रावरील छाननी प्रमुखाकडे देण्यांत यावी.

७. आपल्या फॉर्म्सची छाननी झाल्यानंतर ज्या त्रुटी काढलेल्या असतील त्या त्रुटींची शिट छाननी प्रमुखाकडून स्वाक्षरी करून आपणांस दिली जाईल. छाननी प्रमुख अपणांस जो दिवस निश्चित करुन देईल. त्या दिवशीच सर्व त्रुटींची पूर्तता करुन देणे अनिवार्य आहे. ह्याकरिता कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही.

८. त्रुटीपूर्ततेनंतरच सदर विद्यार्थ्यांचे फॉर्म्स Approved करायचे की, Reject करायचे हे ठरणार आहे.

९. ज्या संस्थांमध्ये अद्यापही केवळ तांत्रिक अडचणीमुळे ज्या विद्यार्थ्यांचे फॉर्म्स भरले गेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांकडून गतवर्षी निर्गमित केलेला ऑफलाईन फॉर्म्स भरून घ्यावयाचा आहे. त्यासोबत सदर विद्यार्थ्यांची सर्व कागदपत्रे त्याच्या ऑफलाईन फॉर्मसह घ्यायची आहेत. अशा फॉर्म्ससोबत संस्थेचे पत्र सादर करावयाचे आहे व सदर पत्रामध्ये त्या विद्यार्थ्याचा फॉर्म कोणत्या तांत्रिक अडचणीमुळे भरता येऊ शकला नाही. याचे कारण नमूद करणे आवश्यक आहे. असे जमा झालेले फॉर्म्स दि. ९/१/२०१७ ते १८/१/२०१७ पर्यंत दुपारी २ ते ५ या वेळात ह्या कार्यालयातील श्री. स्वरुप भामरे, प्रोग्रॅमर ह्यांच्याकडे सादर करावयाचे आहेत.

१०. वरील कालावधीत केवळ तांत्रिक अडचणीमुळे भरता न आलेले फॉर्म्सच स्विकारले जातील. याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी. कागदपत्रांअभावी न भरता आलेले तसेच तांत्रिक अडचणीशिवाय इतर कोणत्याही कारणामुळे न भरता आलेले फॉर्म्स ह्या कार्यालयाकडे कोणत्याही कारणास्तव सादर करु नयेत.

# परिशिष्ट ब

*संस्थांनी त्यांचे प्रस्ताव खालीप्रमाणे विभागवार व दिनांकनिहाय सादर करावयाचे आहेत.*

## मुंबई विभाग

**छाननी केंद्राचे नाव व पत्ता** : रुम नं. १०२, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

| अ.क्र. | दिनांक | संस्थांचे डिटीई कोड |
|---|---|---|
| 1 | 09/01/2017 | 3002, 3003, 3006, 3007, 3012, 3014, 3015, 3016, 3017, 3021, 3023, 3025, 3028, 3036, 3139, 3306, 3464 |
| 2 | 10/01/2017 | 3018, 3026, 3027, 3041, 3142, 3143, 3185 |
| 3 | 11/01/2017 | 3102, 3103, 3104, 3106, 3107, 3108, 3109, 3110, 3113, 3115, 3116, 3117, 3118, 3119, 3120, 3123, 3187 |
| 4 | 12/01/2017 | 3151, 3153, 3155, 3159, 3161, 3165, 3167, 3168, 3169, 3173, 3221, 3423, 3438, 3442, 3468, 3472, 3478, 3488 |
| 5 | 13/01/2017 | 3135, 3144, 3197, 3222 |
| 6 | 16/01/2017 | 3176, 3182, 3183, 3184, 3218, 3460 |
| 7 | 17/01/2017 | 3145, 3181, 3199, 3201, 3215 |
| 8 | 18/01/2017 | 3192, 3203, 3204, 3208, 3240, 3258 |
| 9 | 19/01/2017 | 3148, 3209, 3212, 3214, 3226, 3228, 3234, 3237, 3274 |
| 10 | 20/01/2017 | 3188, 3218, 3247, 3248, 3251, 3266, 3270, 3275, 3277, 3293, 3307, 3350, 3354, 3358, 3359, 3360, 3419, 3421, 3423, 3443, 3446, 3448 |
| 11 | 21/01/2017 | छाननी प्रमुखासाठी राखीव दिवस |

...२.

# ठाणे विभाग

**छाननी केंद्राचे नाव व पत्ता** : बिल्डींग नं. ४, तळमजला, डॉ. व्ही.एन. बेडेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, चेंदणी कोळीवाड्याजवळ, बंदर रोड, ठाणे (पश्चिम)

| अ.क्र. | दिनांक | संस्थांचे डिटीई कोड |
|---|---|---|
| 1 | 09/01/2017 | 3011, 3013, 3039, 3111, 3122, 3124, 3125, 3127, 3130, 3131, 3141, 3147, 3149, 3475 |
| 2 | 10/01/2017 | 3193, 3194, 3224 |
| 3 | 11/01/2017 | 3198, 3210, 3265 |
| 4 | 12/01/2017 | 3217, 3219, 3238, 3474 |
| 5 | 13/01/2017 | 3220, 3225, 3229, 3232, 3236, 3241, 3263, 3268, 3297, 3357 |
| 6 | 16/01/2017 | 3252, 3257, 3280, 3351 |
| 7 | 17/01/2017 | 3133, 3140, 3158, 3260, 3262, 3267, 3282, 3287, 3296, 3353. 3449, 3452, 3465, 3471, 3479, 3482, 3487 |
| 8 | 18/01/2017 | 3285, 3286, 3436, 3445, 3466 |
| 9 | 19/01/2017 | छाननी प्रमुखासाठी राखीव दिवस |

...३.

# नवी मुंबई विभाग

**छाननी केंद्राचे नाव व पत्ता** : कॉम्प्युटर रुम नं.२३, तळमजला, तेरणा इंजिनियरिंग कॉलेज, प्लॉट नं. १२, सेक्टर-२२, फेज-२, नेरुळ रेल्वे स्टेशन जवळ, नेरुळ (पश्चिम), नवी मुंबई-४००७०६.

| अ.क्र. | दिनांक | संस्थांचे डिटीई कोड |
|---|---|---|
| १ | 09/01/2017 | 3008, 3033, 3040, 3101, 3105, 3114, 3132, 3136, 3138 |
| २ | 10/01/2017 | 3146, 3207, 3245, 3427 |
| ३ | 11/01/2017 | 3154, 3160, 3211, 3278 |
| ४ | 12/01/2017 | 3162, 3174, 3189 |
| ५ | 13/01/2017 | 3175, 3190, 3205 |
| ६ | 16/01/2017 | 3196, 3231, 3272, 3276, 3292, 3294 |
| ७ | 17/01/2017 | 3223, 3230, 3235, 3242 |
| ८ | 18/01/2017 | 3256, 3281, 3288, 3298, 3439 |
| ९ | 19/01/2017 | 3244, 3283, 3284, 3422, 3428, 3447, 3450 |
| १० | 20/01/2017 | 3207, 3451, 3458, 3467, 3477 |
| ११ | 21/01/2017 | छाननी प्रमुखासाठी राखीव दिवस |

...४.

# कोकण विभाग

**छाननी केंद्राचे नाव व पत्ता :** फिनोलेक्स ॲकॅडेमी ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, रत्नागिरी
पी-६०/१, एम.आय.डी.सी., मिरजोळे ब्लॉक, रत्नागिरी, पीन-४१५ ६१२.

| अ.क्र. | दिनांक | संस्थांचे डिटीई कोड |
|---|---|---|
| 1 | 09/01/2017 | 3005, 3009, 3010, 3121, 3128, 3163, 3186, 3191, 3239, 3255, 3291 |
| 2 | 10/01/2017 | 3200, 3216 |
| 3 | 11/01/2017 | 3206, 3462, 3481 |
| 4 | 12/01/2017 | 3202, 3469, 3470 |
| 5 | 13/01/2017 | 3233,3264, 3290,3420,3437, 3440, 3463,3480,3486 |
| 6 | 16/01/2017 | छाननी प्रमुखासाठी राखीव दिवस |
| 7 | 17/01/2017 | छाननी प्रमुखासाठी राखीव दिवस |

ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करताना
संस्थेने लेटरहेडवर सादर करावयाचे प्रमाणपत्र व हमीपत्र

**(प्रमाणपत्र व हमीपत्र एकाच लेटरहेडवर सादर करावे.)**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता या संस्थेतील एकूण ........ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी संस्थास्तरावर एकूण ....... अर्जांची छाननी, संस्थांतर्गत छाननी समितीमार्फत करण्यांत आली असून ....... एवढ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत.

| अर्ज प्रत्यक्ष<br>स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी | तपासणी<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी | अर्ज प्रमाणित<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|

## हमीपत्र

या संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता एकूण ....... अर्ज सादर करण्यांत येत असून सर्व अर्जांची छाननी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थेमध्ये ईबीसी अर्ज छाननीकरिता गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यांत आली असून प्रत्येक अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे अचूक व योग्य जोडलेली आहेत. सोबतच्या अर्जामध्ये त्रुटी आढळल्यास व अर्ज नामंजूर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

विद्यार्थ्यांकडून घ्यावयाचे स्वयं घोषणापत्र

# स्वयं घोषणापत्र

मी, ---------------------------------------------------- श्री. ------------------------------------------------ यांचा

मुलगा/मुलगी, वय ......... वर्षे, राहणार ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

------

असे घोषित करतो की, शैक्षणिक वर्ष २०..... -...... मध्ये ------------------------------------------------------------------------

ह्या महाविद्यालयात केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिये मार्फत -------------------------------------------------------- ह्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून सदर शैक्षणिक वर्षात मी शासनाच्या कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचा लाभ घेतलेला नाही. मला इतर योजनेतून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासनाकडे जमा करीन.

विद्यार्थ्याचे नाव व स्वाक्षरी

जे विद्यार्थी त्यांची कागदपत्रे स्वयं साक्षांकीत करतील त्यांच्याकडून खालीलप्रमाणे स्वयंघोषणापत्र जोडणे अनिवार्य आहे.

## प्रपत्र - ब

### स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी ------------------------------------ श्री. ------------------------------------ यांचा

मुलगा / मुलगी वय ........ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास)............................... व्यवसाय ----------------

राहणार ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ----------------

अर्जदाराची सही

अर्जदाराचे नाव ------------------------

दिनांक ....................

# शिक्षण शुल्क तक्ता

| शैक्षणिक वर्ष | शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क | वर्षनिहाय वाढीव शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २०१०-११ | | कॉलम २च्या ७ % | कॉलम २ + ३ |
| २०११-१२ | | कॉलम २च्या ७ % | कॉलम २ + ३ |
| २०१२-१३ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१३-१४ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१४-१५ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१५-१६ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१६-१७ | | कॉलम २च्या ५ % | कॉलम २ प्रमाणे |

## उदाहरणार्थ

| शैक्षणिक वर्ष | शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क | वर्षनिहाय वाढीव शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २०१०-११ | ६०००० | ४२०० | ६४२०० |
| २०११-१२ | ६५००० | ४५५० | ६९५५० |
| २०१२-१३ | ७०००० | ५६०० | ७५६०० |
| २०१३-१४ | ७५००० | ६००० | ८१००० |
| २०१४-१५ | ८०००० | ६४०० | ८६४०० |
| २०१५-१६ | ९०००० | ७२०० | ९७२०० |
| २०१६-१७ | १००००० | ५००० | १०५००० |

शिक्षण शुल्क समितीच्या नियमानुसार थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क व प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क समान असणे अनिवार्य आहे. बऱ्याच संस्था ह्या नियमाचे पालन करताना दिसत नाहीत. त्याकरिता संस्थांना सूचित करण्यांत येते की, थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शुल्क व प्रथम वर्ष उत्तीर्ण होऊन द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क समान असावे.

# "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीयोजना" शैक्षणिक वर्ष २०१६-१७

साध्या पेपरवर विद्यार्थी वडील / आई/ पालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र

१. मी /आम्ही खाली सही करणार असे प्रमाणित करतो/ करते की, मी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील आहे. कुटूंबातील दोन्ही पालकांचे वार्षिक आर्थिक उत्पन्नाचे निकष पुर्ण करतो/करते तसेच मी /आम्ही दिनांक ३१ मार्च २०१६ व दि. १३ ऑक्टोंबर, २०१६ रोजीचा शुल्क प्रतिपुर्तीबाबतचा शासन निर्णय वाचला असून त्यातील सर्व अटी मान्य आहेत.

२. मी / आम्ही महाराष्ट्र राज्याचा अधिवासधारक आहे / वादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील अधिवासधारक आहे.

३. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) झालेला आहे.

४. मी / आम्ही फक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मिळणाऱ्या योजनेच्या सवलतीचा लाभ घेतलेला आहे / अन्य कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही, अशी हमी देत आहे.

५. मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक सत्राची परिक्षा देणे मला बंधनकारक आहे. याची मला जाणीव आहे. मी एखादया सत्राची (सेमिस्टरची) परिक्षा दिलेली नसल्यास अथवा एखादया वर्षात अनुतीर्ण झाल्याने पुढील वर्षी प्रवेश न मिळाल्याने सदर योजना लागू राहणार नाही. मी अभ्यासक्रम पूर्ण करतांना एकुण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुतीर्ण झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी मला प्रवेश मिळाला नसेल तर उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी मला लाभ मिळण्यास मी अपात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

६. मी / आम्ही संस्थेला दिलेली अर्जात नमुद केलेली माहीती चुकीची अथवा दिशाभुल करणारी नाही. संस्थेला सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे निदर्शनास आल्यास उर्वरित कालावधीसाठी मला लाभ मिळणार नाही. तसेच मला मिळालेली प्रतिपुर्ती शुल्काची रक्कम व्याजासह माझ्याकडून वसूल करण्यात येईल. त्यापुढे मला शिष्यवृत्ती /शुल्क प्रतिपुर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल याची मला जाणीव आहे. व होणाऱ्या परिणामास किंवा शिक्षेस सर्वस्वी मी / आम्ही स्वत: जबाबदार राहील

७. माझ्या स्वत:च्या चुकीने / वर्तनामूळे शैक्षणिक प्रगती करीत नसेल, पूर्व परवानगी शिवाय मी अनियमित गैरहजर राहत असेल असे संस्थाप्रमुखाच्या निदर्शनास आले. तर माझी शुल्क प्रतिपुर्ती रक्कम त्वरीत थांबविण्यात येईल किंवा समाधान न झाल्यास रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

८. मी मध्येच अभ्यासक्रम सोडून गेलो तर मला प्रदान केलेल्या प्रतिपुर्तीची रक्कम शासनास योग्य वाटल्यास माझ्याकडून वसूल करू शकेल याची मला कल्पना आहे.

९. प्रतिपुर्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पुर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व बदल केल्यामुळे आमचे नुकसान झाल्यास मी / आम्ही किंवा संस्थां शासना विरूध्द दावा / तक्रार करणार नाही.

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांची सही | विद्यार्थ्यांच्या पालकांची सही |
| (नाव:- ) | (नाव:- ) |

संस्था प्रमुखाची सही व शिक्का

"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना" शैक्षणिक वर्ष २०१५-१६

## साध्या पेपरवर विद्यार्थी वडील / आई/  पालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र

१. मी/ आम्ही डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी पात्र असुन विद्यार्थ्याचे पालक अल्पभुधारक शेतकरी आहेत किंवा नोदणीकृत मजुर आहेत. तसेच वसतीगृहात प्रवेश घेतलेला आहे. तसेच याव्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन (उदा. व्यावसाय/व्यापार/नोकरी इत्यादी ) किंवा उत्पन्नाचे स्त्रोत नाही.

२. मी / आम्ही महाराष्ट्र राज्याचा / वादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील अधिवासधारक आहे

३. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेव्दारे (CAP) झालेला आहे.

४. मी / आम्ही फक्त डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वह भत्ता योजनेसाठी सवलतीचा लाभ मंजुरीस्तव अर्ज करीत आहे. वसतीगृह निर्वाह भत्याच्या अन्य कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही, अशी हमी देत आहे.

५. मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक सत्राची परिक्षा देणे मला बंधनकारक आहे. याची मला जाणीव आहे.   मी एखादयासत्राची (सेमिस्टरची) परिक्षा दिलेली नसल्यास अथवा एखादया वर्षात अनुतीर्ण झाल्याने पुढील वर्षी प्रवेश न मिळाल्याने सदर योजना लागू राहणार नाही मी अभ्यासक्रम पूर्ण करतांना एकुण कालावधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत: अनुतीर्ण झाल्याने त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी मला प्रवेश मिळाला नसेल तर उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी मला लाभ मिळण्यास मी अपात्र राहीन. याची मला जाणीव आहे.

६. मी / आम्ही संस्थेला दिलेली अर्जात नमुद केलेली माहीती चुकीची अथवा दिशाभुल करणारी नाही  संस्थेला सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे निदर्शास आल्यास उर्वरित कालावधीसाठी मला लाभ मिळणार नाही. तसेच मला मिळालेली लाभाची रक्कम व्याजासह माझ्याकडून वसूल करण्यात येईल. त्यापुढे मला निर्वाह भत्ता मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल याची मला जाणीव  आहे व होणाऱ्या परिणामास किंवा शिक्षेस सर्वस्वी मी / आम्ही स्वत: जबाबदार राहील

७. माझ्या स्वत:च्या चुकीने / वर्तनामूळे शैक्षणिक प्रगती करीत नसेल, पूर्व परवानगी शिवाय मी अनियमित गैरहजर राहत असेल असे संस्थाप्रमुखाच्या निदर्शनास आले.  तर माझा निर्वाह भत्ता रक्कम त्वरीत थांबविण्यात येईल किंवा समाधान न झाल्यास रद्द करण्यात येईल. याची मला जाणीव आहे.

८. मी मध्येच अभ्यासक्रम सोडून गेलो तर मला प्रदान केलेल्या लाभाची रक्कम शासनास योग्य वाटल्यास माझ्याकडून वसूल करू शकेल याची मला कल्पना आहे.

९. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पुर्वसूचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व बदल केल्यामुळे आमचे नुकसान झाल्यास मी / आम्ही किंवा संस्थां शासना विरूध्द दावा / तक्रार करणार नाही.

विद्यार्थ्यांची सही

विद्यार्थ्यांच्या पालकांची सही

(नाव:- ____________________)

(नाव:-____________________)

ॲप्लीकेशन आयडी : ______________

संस्था प्रमुखाची सही व शिक्का

# बोनाफाईड प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ________________________________________
ॲप्लीकेशन आयडी ____________________ यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये
____________________________________________________________________
____________________________________________________________________
(महाविद्यालयाचे नाव व डीटीई कोड सहीत) महाविद्यालयात ____________________________
(अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी, एमबीए, एमएमएस, एमसीएम) या पदविका / पदवी / पदव्यत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला आहे, व त्याआधारे वसतीगृहात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेश घेतलेला आहे. तो /ती नियमित महाविद्यालयामध्ये अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असून त्यांचे वर्तन चांगले आहे. त्यांना डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना मंजुरीसाठी शिफारस करण्यात येत आहे.

दिनांक : ____ / _____ / ________

वसतीगृह प्रमुखाची सही व शिक्का,

वसतीगृह नोंदणी क्रमांक : ______________________________________________